नोंद

# डॉ. जगन्नाथ पाटील

जपान सरकारच्या अखत्यारीतील राष्ट्रीय शैक्षणिक गुणवत्ता मूल्यांकन संस्थेने (नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ अकॅडमिक डिग्रीज् अँड क्वालिटी इव्हॅल्यूएशन) विशेषज्ञ म्हणून कोल्हापूरच्या डॉ. जगन्नाथ पाटील यांची नियुक्ती झाली आहे. पाटील यांनी गेले दशकभर आंतरराष्ट्रीय पातळीवर उच्चशिक्षण क्षेत्रात गुणवत्ता वाढीसाठी जे काम केले, त्याची दखल घेऊन जपान सरकारने त्यांना या पदासाठी निमंत्रित केले आहे. देशातील उच्चशिक्षण संस्थांचे गुणात्मक मूल्यमापन करणाऱ्या बेंगळुरूच्या 'नॅक' संस्थेत सल्लागार म्हणून त्यांनी उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात जागतिक पातळीवर काम केले. एशिया पॅसिफिक क्वालिटी नेटवर्क (APQN) या संस्थेचे अध्यक्षपद भूषवताना त्यांनी जागतिक संस्थेचे अध्यक्षपद मिळवण्यासाठी मोर्चेबांधणी केली. आणि अडीचशे देशांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या 'इंटरनॅशनल नेटवर्क फॉर क्वालिटी अॅश्युरन्स एजन्सीज इन हायर एज्युकेशन' (INQAAHE) या संस्थेचे निवडणूक लढवून ते अध्यक्ष बनले. या संस्थेला पहिल्यांदाच आशियाई अध्यक्ष लाभला. एपीक्यूएन संस्थेचे अध्यक्ष म्हणून काम करताना त्यांनी त्याअंतर्गत गुणवत्ता संस्थांचे गुणवत्ता नियंत्रण करणारी एशिया पॅसिफिक क्वालिटी रजिस्टर ही संस्था सुरू केली आणि आजही या संस्थेचे ते अध्यक्ष आहेत. इंडिया युरोप हायर एज्युकेशन बेंचमार्किंग फॉर क्वालिटी मॅनेजमेंट हा प्रकल्प पाटील यांच्या पुढाकाराने सुरू असून त्यासाठी युरोपियन युनियनने अनुदान दिले आहे. कोल्हापूर जिल्ह्यात तिटवे (ता. राधानगरी) हे पाटील यांचे मूळ गाव. १९७१ च्या भारत-पाक युद्धात शहीद झालेले सीताराम पाटील आणि वीरपत्नी लक्ष्मीबाई पाटील यांचे ते पुत्र. वडिलांच्या मृत्यूनंतर आईने त्यांना वाढवले. शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या विभागातून पीएचडी पदवी मिळवल्यानंतर शिवाजी विद्यापीठात उपकुलसचिव, त्यानंतर नॅकमध्ये सल्लागार झाले आणि तिथूनच उच्च शिक्षण क्षेत्रातील जागतिक पातळीवरील प्रवास सुरू झाला. जपान आणि भारत यांच्यात पारंपरिकरित्या सांस्कृतिक आणि नंतरच्या काळात औद्योगिक क्षेत्रात संबंध वाढीस लागले. डॉ. पाटील यांच्या या नियुक्तीनंतर दोन देशांमध्ये शैक्षणिक क्षेत्रातील आदान-प्रदानाचा मार्ग मोकळा झाला आहे.



पुढारी

# विद्यापीठात गुरुवर्य कृतज्ञता सोहळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागात गुरुवर्य कृतज्ञता सोहळा साजरा करण्यात आला. याप्रसंगी विभागाच्या माजी शिक्षकांना निमंत्रित करून त्यांचा सत्कार करण्यात आला.


कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अधिविभाग प्रमुख प्रा. डॉ. प्र. नि. वासंबेकर होते. डॉ. पवन गायकवाड यांनी स्वागत केले. अधिविभागाची वाटचाल, प्रगती व भविष्यातील रोडमॅप या संदर्भात प्रा. डॉ. आर. के. कामत यांनी माहिती दिली.

इलेक्ट्रॉनिक्स विभागाची स्वतंत्र इमारत उभारणी करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांची माजी शिक्षकांनी माहिती दिली. प्रा. ए. एस. वैंगणकर, प्रा. डॉ. ए. वाय. खोत, प्रा. डॉ. सी. एस. शाळगावकर, प्रा. डॉ. एम. डी उपलाने यांनी मनोगते व्यक्त केली.

डॉ. एम. के. भानारकर यांनी आभार मानले. डॉ. पी. ए. कदम, डॉ. एस. ए. शिंदे, एस. एम. मस्के, ए. जे. पवार यांनी कार्यक्रम यशस्वितेसाठी परिश्रम घेतले.

# पदार्थविज्ञान संशोधनात लिब्ज तंत्रज्ञान महत्त्वाचे

## प्रा. डॉ. ए. के. राय; भौतिकशास्त्र अधिविभागात व्याख्यान



**कोल्हापूर : व्याख्यानात बोलताना प्रा. डॉ. ए. के. राय.**

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

पदार्थविज्ञानाच्या संशोधनामध्ये लेझर इंड्युस्ड ब्रेकडाऊन स्पेक्ट्रोस्कोपी अर्थात लिब्ज हे तंत्रज्ञान महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन अलाहाबाद विद्यापीठातील प्रा. डॉ. ए. के. राय यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र अधिविभागात आयोजित 'लिब्ज- अ पोटेंशिअल ॲनॅलिटिकल टूल फॉर द कॅरेक्टरायझेशन ऑफ मटेरिअल्स' विषयावरील विशेष व्याख्यानात डॉ. राय बोलत होते. अध्यक्षस्थानी अधिविभागप्रमुख प्रा. डॉ. पी. एस. पाटील होते.

प्रा. राय म्हणाले, लिब्ज तंत्रज्ञानाचा उपयोग करून पदार्थांमधील मूलद्रव्य घटकांचा अभ्यास करता येतो. स्पंदित लेझर पदार्थावर आदळल्यानंतर तेथे तयार होणार प्लाझ्मा, ऑप्टिकल फायबर डिटेक्टरच्या मदतीने पडताळला जातो. प्लाझ्माच्या अभ्यासातून विविध मूलद्रव्यांच्या अस्तित्वाचे मूल्यमापन करता येते. या तंत्रज्ञानाचा उपयोग करून त्यांनी पाण्यात मिश्रित झालेल्या क्रोमिअमसारख्या




घटकांचा अभ्यास करून त्या पाण्याच्या दर्जाबाबत काटेकोर विश्लेषण करता येते.

यावेळी डॉ. व्ही. जे. फुलारी, डॉ. के. वाय. राजपुरे यांच्यासह अधिविभागातील विद्यार्थी उपस्थित होते.

पुढारी

# सिव्हिल एव्हिएशनमधील संधींबाबत व्याख्यान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठातील भौतिकशास्त्र अधिविभागात प्लेसमेंट सेलमार्फत 'डीजीसीए'चे माजी पदाधिकारी आर. बी. पाटील यांचे 'करिअर इन सिव्हिल एव्हिएशन-इंडियन एअर फोर्स' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. पी. एस. पाटील होते.

याप्रसंगी आर. बी. पाटील यांनी भौतिकशास्त्राच्या विद्यार्थ्यांसाठी इंडियन एअर फोर्समधील अनेक करिअर संधींची माहिती दिली. विमानचालक कसा असावा, त्यासाठी लागणारे शिक्षण, पात्रता परीक्षा, विविध लायसन्स, प्रशिक्षण, एअरक्राफ्टचे स्वरूप व प्रकार इत्यादींबद्दलची परिपूर्ण माहिती तसेच निवडप्रक्रियेबद्दल त्यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली.

डॉ. मानसिंग टाकळे यांनी परिचय करून दिला. दामिनी माळी हिने आभार मानले. यावेळी डॉ. व्ही.जे. फुलारी, डॉ. के. वाय. राजपुरे, डॉ. ए. व्ही. मोहोळकर, डॉ. एन. एल. तरवाळ उपस्थित होते.

# स्टडी लॅम्पचे सौरदूतांना प्रशिक्षण

## शिवाजी विद्यापीठात 'गांधी ग्लोबल सौर यात्रे' अंतर्गत उपक्रम

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. ४ : स्वच्छ ऊर्जा आणि ऊर्जेच्या संदर्भात स्वयंपूर्णता हा जगातील प्रत्येक नागरिकाचा अधिकार आहे. त्यासाठी युवकांनी अपारंपरिक ऊर्जेचा वापर करून गांधी जयंतीच्या निमित्ताने पर्यावरणाप्रती अहिंसा व प्रेम प्रदर्शित करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.**

शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागात आयआयटी, मुंबई यांच्या सहकार्याने महात्मा गांधी जयंतीच्या निमित्ताने 'गांधी ग्लोबल सौरयात्रा' उपक्रमांतर्गत विद्यार्थी सौरदूत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यशाळेत सौरदूतांना सोलर स्टडी लॅम्प बनविण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जे. एस. बागी म्हणाले, की गांधी ग्लोबल सौर यात्रेतून जगभरात सौरऊर्जेबाबत जागृती तसेच अपारंपरिक ऊर्जा वापरण्यासाठी प्रोत्साहन देण्याचा उद्देश आहे. याद्वारे अत्यल्प खर्चात विश्वासार्ह आणि टिकाऊ सौर उपकरणांची निर्मिती शक्य आहे. अशा उपक्रमांतून युवकांना रोजगार निर्मितीसाठी सक्षम बनविण्याबरोबरच स्थानिकांना या उर्जेचा लाभ देणेही शक्य होणार आहे. उद्‌घाटन समारंभाला प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदिवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे उपस्थित होते. तंत्रज्ञान अधिविभागातील प्रवीण प्रभू यांनी कार्यशाळेचे समन्वयक व मार्गदर्शक म्हणून काम पाहिले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील तंत्रशिक्षण विभागातील विद्यार्थ्यांनी सौरदिवे बनवण्याचे प्रशिक्षण घेतले.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
5 OCT 2019
तरुण भारत

# न्यू कॉलेज येथे ११ रोजी राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा

प्रतिनिधी
कोल्हापूर

ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डी. बी. पाटील अमृतमहोत्सवी व सांस्कृतिक कार्यक्रम समिती आणि न्यू कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डी. बी. पाटील राज्यस्तरीय महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा आयोजित केली आहे. शुक्रवार ११ रोजी न्यू कॉलेज, शिवाजी पेठ येथे सकाळी साडेनऊ वाजता स्पर्धेस प्रारंभ होईल. कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे उद्घाटन करतील.

यावेळी प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे चेअरमन ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डी. बी. पाटील, शिवाजी विद्यापीठाचे माजी शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे प्रमुख उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती स्पर्धा समिती प्रमुख प्रा. विनय पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पाटील म्हणाले, स्पर्धेचे यंदाचे तिसरे वर्ष आहे.न्यू कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील म्हणाले, स्पर्धा वरीष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपुरती मर्यादित आहे. पदव्युतर व कनिष्ठ विद्यार्थ्यांना सहभागी होता येणार नाही. स्पर्धेसाठी ऑनलाईन नावनोंदणी करायची असून प्रवेश शुल्क १५० रुपये तर तत्काळ नोंदणीसाठी २०० रुपये आहे. महाविद्यालयाच्या nck@newcollage.ac.in संकेतस्थळावर नावनोंदणी करता येईल. तर बँक ऑफ महाराष्ट्र ६०२३२७८९१२८ या खाते क्रमांकावर प्रवेश शुल्क भरता येईल. स्पर्धेतील प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाच्या विजेत्यांना अनुक्रमे दहा, सात आणि पाच हजार रुपये व चषक देण्यात येणार आहे. तर चतुर्थ क्रमांकाला दोन आणि उत्तेजनार्थ दोन विजेत्यांना एक हजार रुपये पारितोषिक देण्यात येणार आहे.. स्पर्धेदिवशीच सायंकाळी ५ वाजता शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते पारितोषिक वितरण होणार आहे, असे स्पर्धेच्या मुख्यसमन्वयक डॉ. कविता गगराणी यांनी सांगितले.

**स्पर्धेतील विषय -**
राजर्षी शाहू महाराजांच्या शैक्षणिक विचारांची प आर्थिक मंदिच्या चक्रव्युहात भारत?, महिला सबलीकरण : वास्तव आणि आभास, चांद्रयान २ : यश की अपयश, कृत्रिम बुद्धिमत्तेचे आव्हान व पर्यावरण असंतुलन आणि पृथ्वीचे भवितव्य.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
5 OCT 2019
तरुण भारत

# अपारंपरिक उर्जेचा वापर करावा

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचे आवाहन:गांधी ग्लोबल सौर यात्रा उपक्रमांतर्गत सौरदूत कार्यशाळा उत्साहात

प्रतिनिधी
कोल्हापूर

ग्लोबल वॉर्मिंग सदृश हवामान बदलांच्या पार्श्वभूमीवर पर्यावरणाप्रती सजगता आणि स्वच्छ उर्जेचा पुरस्कार करण्याची नितांत गरज आहे. स्वच्छ ऊर्जा आणि ऊर्जेच्या संदर्भात स्वयंपूर्णता हा जगातील प्रत्येक नागरिकांचा अधिकार आहे. त्यासाठी युवकांनी अपारंपरिक ऊर्जेचा वापर केला पाहिजे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागात व मुंबई आयआयटीच्या सहकार्याने महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त 'गांधी ग्लोबल सौर यात्रा' उपक्रमांतर्गत विद्यार्थी सौरदूत कार्यशाळेत ते बोलत होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागात आयोजित सौरदूत कार्यशाळेत सोलर स्टडी लँप तयार करणारे विद्यार्थी.

या कार्यशाळेत २५० सौरदूतांना सोलर स्टडी लँप बनविण्याचे प्रशिक्षण देण्यात आले.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, गांधी जयंतीच्या निमित्त केवळ देशातच नव्हे, तर जगभरातील ८० देशांतील सुमारे चार हजार केंद्रांमध्ये ग्लोबल सौर यात्रेचे आयोजन केले. त्यामध्ये तंत्रज्ञान अधिविभागाचा समावेश करण्यात आला आहे. अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घेऊन सौर उर्जेचा वापर केला पाहिजे.त्यानुसार जनसामान्यांचे जीवन सुखकर करण्यासाठी कसा करता येईल, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जे.एस. बागी यांनीही मनोगत व्यक्त केले.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे, तंत्रज्ञान अधिविभागातील प्रवीण प्रभू आदी उपस्थित होते.